Vol 2 Issue 7 April 2013

ISSN No : 2249-894X

## *Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

*Review Of Research*
Vol. 2, Issue. 7, April. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *सुलतानशाहीच्या काळातील शेती – एक अभ्यास*

***गौतम गोविंद सोनवणे***

सह–प्राध्यापक, इतिहास विभाग, एस.बी.कॉलेज, शहापूर, जि. ठाणे.

***सार:***–प्रस्तुत लेखात सुलतानशाहीच्या कालखंडातील शेती विषयी आढावा घेण्यात आला आहे .इ. स. 1206 ते 1526 या सुलतानशाहीच्या काळात अनेक महान सुलतान होऊन गेले. त्यांनी राजकारण धर्मकारणाबरोबरच अर्थकारणाकडे लक्ष पुरविले. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने सुलतानाने शेतीकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन शेतीत परिवर्तन केले. शेतीला आवश्यक असणाऱ्या बाबींची पूर्तता केली. शेतीतंत्र विकसित केले . मुबलक पाणी पुरवठ्याची सोय केली. शेतकऱ्यांना सर्वांगिण मदत केली. ज्यामुळे शेती क्षेत्रात प्रचंड प्रगती घडून आली.

**Keywords:** सुलतानशाही, शेती, शेतसारा, शेतीतंत्र.

### *प्रस्तावना:–*

इ. स. 1206 ते 1526 हा कालखंड भारताच्या इतिहासात ''सुलतानशाहीचा कालखंड'' म्हणून ओळखला जातो. या कालखंडात गुलाम, खिलजी, तुघलक, सय्यद आणि लोदी घराण्यांनी दिल्लीच्या गादीवरुण राज्य केले. पूर्व मध्ययुगीन कालखंडात अरब तुर्कांनी भारतात प्रचंड धुमाकुळ घातला होता. येथील मंदिरे लुटली, गावे बेचिराख केली, शेतकऱ्याची उभी पीके उद्धवस्त केली. मुस्लिमांची भारतावरील आक्रमणे म्हणजे पूर्णतः एकतर्फी युध्देच होती. त्यामुळे प्राचीन काळापासून स्थिर असलेली अर्थव्यवस्था कोळमडून पडली. इ.स. 1192 च्या तराईनच्या विजयाने भारताचे प्रवेशद्वार मुस्लिमांना खुले झाले. अजमेर शासक पृथ्वीराज चव्हाण तिसऱ्याच्या पराभवाने भारतातच्या मध्य युगाला सुरुवात झाली.

सुरूवातीच्या धामधुमीच्या काळात अरब–तुर्कांचा शस्त्रात्रावर सैन्यावर प्रचंड खर्च होत असे. हा खर्च भरुन काढण्यासाठी सुलतानांनी वेळोवेळी लुट केली. शेतकऱ्यावर अन्याय अत्याचार करीत त्यांच्यावर जुल्मी कर लादले. सुलतानांच्या या धोरणाविषयी अमीर खुस्त्रो म्हणतो– ''सुलतानाच्या राजमुकुटातील प्रत्येक मोती म्हणजे गरीब शेतकऱ्यांच्या अश्रूपूर्ण नेत्रांतुन पडलेला रक्ताचा थेंब आहे.'' यावरून सुलतानी संकटाच्या भीषणतेची कल्पना येते.
परकीय सुलतानांनी आपल्या सोबत आणलेल्या ''टोळी संस्कृतीचा भारताच्या इतिहासावर दूरगामी परिणाम झाला. त्यांनी कृषी, महसुल व्यवस्था, व्यापार, उद्योग, नाणकशास्त्र, गुलामगिरी, नागरीकरण या क्षेत्रात काही नवीन संकल्पना निर्माण केल्या.

### *संशोधनाची उद्दिष्टे :*

सुलतानशाहीच्या काळातील शेती व्यवसायाचा अभ्यास करण्यासाठी पुढील उद्दिष्टे ठेवण्यात आली आहेत .

1) मध्ययुगीन भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे योगदान जाणून घेणे
2) सुलतानशाहीच्या काळातील उत्पन्ना विषयी माहिति घेणे
3) सुलतानशाहीच्या काळातील शेतीला पुरवल्या जाणाऱ्या सोयी ,सुविधा जाणून घेणे.

### *सुलतानशाहीच्या काळातील शेती व्यवसायात परिवर्तनः—*

सुलतानशाहीच्या काळातील आर्थिक जीवन मुख्यतः शेतीवर अवलंबून होते आणि शेती निसर्गावर आधारित होती. त्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्या वर वर वाढत चालल्या होत्या. शेतकऱ्यांना दुष्काळी परिस्थितीला तोंड द्यावे लागत होते. शासनकऱ्यांचे शेतीकडे दुर्लक्ष झाले होते. सुलतानशाहीच्या काळात आर्थिक क्षेत्रात नवनवीन कल्पना अमंलात आल्या. अर्थव्यवस्थेच्या सुधारणेकडे सुलतानांनी लक्ष दिले. म्हणजे सुलतानशाहीच्या काळात आर्थिक परिवर्तनाला सुरुवात झाली. हे परिवर्तन ग्रामीण आणि शहरी दोन्ही स्तरावरचे होते.[1]

भारतीय शेतीची प्रशंसा करीत इन्न बतूताने सविस्तर लिहीले आहे. ''शेतकरी एक पीक घेतल्याबरोबर त्याच शेतीत दुसरे पीक घेत होता. एवढी जमीन उत्पन्न देणारी होती.'' पुढे इन्न बतूता म्हणतो की, ''शेतकरी तांदळाचे पीक वर्षातून तीन वेळ घेत होता. शक्यतो शेतकरी दोनच वेळ पीक घेत असतो.''

### *गुलाम घराण्याच्या काळातील शेती व्यवसाय (इ.स.1206— इ.स.1290) —*

सुलतानशाहीच्या काळातील दिल्लीवर राज्य करणारे पहिले घराने म्हणून गुलाम घराने ओळखले जाते. या काळात शेती हाच प्रमुख व्यवसाय आणि आर्थिक जीवनाचा मूळ आधार होता. देश धनधान्याने परिपूर्ण होता . हा काळ सुरुवातीचा असल्यामुळे सतत युद्ध आणि बंडाचा होता. त्यामुळे गुलाम शासकांना शेतीकडे फारसे लक्षं देता आले नाही. त्यापूर्वीच्या काळात शेतसारा निश्चित करण्याची पद्धत नव्हती. याच काळात प्रथम शेतीतील उत्पन्नावरून शेतसारा निश्चित करण्याची पद्धत सुरू झाली.

### *खिलजी काळातील शेती व्यवसायः—(इ . स .1290 —1320)*

दिल्ली सुलतानशाहीचा अल्लाउद्दीन खिलजी पहीला सुलतान होता ज्याने राजस्वपध्दती करप्रणाली आणि शेती व्यावसायाकडे लक्ष पूरवले. अल्लाउद्दीन खिलजीने जहागिरी देण्याची पद्धत बंद करून पूर्वीच्या काळात दिलेल्या इनाम जमिनी, धार्मिक संस्थाच्या ताब्यातील संपत्ती व इनामे सर्व जप्त करून ते सरकारी तिजोरीत जमा केले. जमीनीची मोजणी करण्याची पद्धत सर्वप्रथम अल्लाउद्दीन खिलजीनेच आमलात आणली. जमीनीच्या उत्पादन क्षमतेनुसार जमीन महसूल आकारण्याचे धोरण अल्लाउद्दीननेच आखले. त्याने उत्पन्नाच्या १/२ शेतसारा आकारला. शेतसारा रोख किंवा धान्याच्या स्वरुपात स्विकारला जात असे. अल्लाउद्दीनने इक्ता जमीनी खालसा करण्याचे धोरण अवलंबिले आणि सरकार व शेतकरी यांच्यात मध्यस्थांची भूमिका करणारे इक्तेदार, मुक्ती, खोत, मुकादम, चौधरी यांचे अधिकार नष्ट केले. त्यांच्या परंपरागत सवलती बंद करून त्यांनाही सर्वसामान्यांप्रमाणे करांच्या चक्रात आणले. अल्लाउद्दीन पटवारी आणि महसूल अधिकार्यांच्या हिशोब वह्या तपासत असे. दोषी आढळणार्याअस कठोर शिक्षा देत असे. जमीनीची मोजणी करून शेतसारा ठरवणारा अल्लाउद्दीन हा दिल्लीचा पहिलाच सुलतान होता. शेतसारा वसूल करणार्याल अधिकार्याअनी भ्रष्टाचार करू नये म्हणून अल्लाउद्दीनने त्यांच्या वेतनात वाढ केली. त्यासाठी नवीन कार्यक्षम अधिकार्यालच्या नेमणूका केल्या आणि शेतकर्यांवर सक्ती केली की, सरकारने निर्धारीत केलेल्या दरानेच व्यापार्याआना धान्य विकावे. मालाच्या खरेदी—विक्रीसाठी वेगवेगळया बाजारपेठांची निर्मिती केली. दिल्लीत मालाच्या खरेदी—विक्रीसाठी 'सूराय—ए—आदल' (कापड बाजार) आणि 'शहना—ए—मंडी' (धान्य बाजार) स्थापना केली.[2]

### *तुघलक काळातील शेतीव्यवसायः—(1320—1414)*

तुघलक काळातील शेती ही निसर्ग आणि नदीच्या पाण्यावर अवलंबून होती. नदीचे पाणी रहाटाद्वारे शेतीला पूरवले जात असे. तुघलक वंशातील गयासुद्दीन तुघलक पहिला सुलतान होता ज्याने कालव्यांची निर्मिती केली होती. त्याच्यानंतर फिरोज तुघलकाने त्यात प्रचंड सुधारणा केल्या. तुघलक सुलतानांनी शेती सुधारणेकडे विशेष लक्ष दिल्याचे दिसते.

गयासुद्दीन तुघलकाने शेतीला प्रोत्साहन दिले. मुकादम, जमीनदार, चौधरी, खोत यांना पूर्वीचे अधिकार दिले जे अल्लाउद्दीनने नष्ट केले होते. त्यांना ज्याप्रमाणे बल्बनच्या राजवटीत स्वातंत्र्य होते ते कायम ठेवले. त्यांना कर वसूलीचे सर्व अधिकार आणि मानधन दिले पण शेतकर्या वर अन्याय केला जाऊ नये अशी तंबी दिली. शेतकऱ्यांकडून सहानूभूतीपूर्वकपणे कर गोळा करण्याचे आदेश दिले. याशिवाय लूटारूंपासून शेतीला संरक्षण मिळावे म्हणून त्याने मोठमोठे दूर्ग बनवले. परंतु सुलतानाचे काही नियम अतिशय कडक असल्याचे मत इतिहासकार बरनी नोंदवतो. तो म्हणतो की, ''काही वर्गातील लोकांवर असे जबर कर बसवले जात असत की हे लोक निर्धन, अंध आणि दरिद्री बनत असत.''[3]

मुहम्मद तुघलकाने शेती सुधारणेकडे विशेष लक्ष पूरवले. शेती विकासासाठी मोठे प्रयत्न केले. शेतकऱ्यांना बी—बीयाने तसेच बैल विकत घेण्यासाठी, विहीरी खोदण्यासाठी अल्पदरात कर्जे उपलब्ध करून दिली. पडीक जमीनीची

मशागत आणि शेतीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी त्याने ''दिवाण–ए–कोही'' हे नवीन खाते सुरू केले. या खात्यामार्फत शेतकऱ्यांना कर्जे देवून शेतजमीन विहीरीच्या पाण्याखाली आणण्यासाठी प्रोत्साहन दिले. शेतात प्रत्येक हंगामात आलटून–पालटून वेगवेगळी पिके घ्यावेत असा सल्ला दिला होता. मुहम्मद तुघलक शेतकर्यागना म्हणत असे की शेतीतून वेगवेगळी पिके काढून उत्पन्नात सुधारणा झाली पाहिजे. गव्हाच्या पिकाच्या जागी ऊसाचे आणि अंगूरचे उत्पन्न काढले पाहिजे.

इब्न बतूता म्हणतो,'' सुलतानशाहीच्या काळातील फळांच्या उत्पादनाबद्दलही माहिती मिळाली आहे. सुरूवातीला शेतकऱ्यांना अंगूरच्या फळाचे रोप लावण्याचे ज्ञान नव्हते परंतु 14 व्या शतकात त्याचे उत्पादन एवढे वाढले की त्याच्या किंमतीत मोठी घसरण झाली. खरे तर मुहम्मद तुघलकाला अप्रामाणिक अधिकारी वर्ग मिळाल्याने या योजनामध्ये तो अयशस्वी ठरला.[4]

डॉ ए. एल. श्रीवास्तव म्हणतात–''मुहम्मद तुघलकाने सरकारी कर्मचार्योच्या देखभालीसाठी ६० कि.मी. जमीनीचे क्षेत्र निवडून शेतकऱ्यांना शेती कसण्यास भाग पाडले''. सतत तीन वर्षे बारी–बारीने पिकांचे उत्पन्न घेऊन ७० लाखाचे उत्पन्न मिळवले.[5]

फिरोजशहा तुघलक तुघलक वंशातला महान शासक होता. त्याला राज्याच्या कृषी विकासात रस होता. तुघलक वंशात कालवे बनवणारा पहिला सुलतान म्हणून गयासुद्दीन तुघलकाचे नाव घेतले जाते. पण त्याच्या नंतर आलेल्या फिरोज तुघलकाने अनेक कालव्यांची निर्मिती करून शेतीला पाणीपुरवठा केला. त्याने यमूना नदी आणि काली नदीवरून शेतीला पाणी पुरवठा केला. याबाबतीत अफीफ हा विद्वान म्हणतो–''पूर्व पंजाबमध्ये सुरूवातीला वार्षिक एकच पीक घेतले जात होते. पण पाण्याच्या सोयी सुविधेमुळे खरीप आणि रब्बी दोन्ही पिके घेतले जाऊ लागली''. पुढे हा विद्वान म्हणतो– ''या काळात एकही गाव उजाड राहिले नाही आणि एक गज जमीन अशी राहिली नाही जी शेतीयोग्य होती.''[6]

फिरोज तुघलकाने एकुन पाच कालवे, अनेक धरणे आणि 150 विहीरींची निर्मिती केली होती. या पाण्यावर त्याने दिल्लीजवळ अंगूर आणि खरबूजांच्या बाराशे बागा तयार केल्या होत्या. त्यातून भरघोस उत्पादन मिळत होते. त्याच्या या धोरणामुळे शेतीयोग्य जमीनीच्या क्षेत्रफळात प्रचंड वाढ झाली.

फिरोज तुघलकाने सुरूवातीपासूनच शेतसारा वसूलीसंदर्भात उदार धोरण स्विकारले होते. त्याने मुहम्मंद तुघलकाच्या काळात शेतकऱ्यांना दिलेली कर्जे माफ केली आणि उलेमा वर्गाला त्यांच्या खालसा जमीनी परत केल्या. तसेच त्याने गैरपणे होणारी करवसूली बंद केली. कारण याचा अप्रत्यक्ष बोजा शेतकऱ्यांवर पडत होता. फिरोजच्या काळात 1/3 ते 1/5 इतका शेतसारा वसूल केला जात असे. फिरोजशहाने सरकारी कालव्याचे पाणी वापरणाऱ्या शेतकऱ्यांवर उत्पन्नाच्या 1/10 इतका भू–सिंचन कर आकारला. या कराव्यतिरिक्त कोणतेही कर शेतकऱ्यांकडून वसूल न करण्याचे आदेश दिले. ख्वाजा हिमायुद्दीन यास महसूलमंत्री नेमून त्याच्या सहाय्याने राज्याचे एकूण उत्पन्न वाढवण्यात फिरोज तुघलक यशस्वी ठरला.7

### *लोदी काळातील शेती व्यवसायः–1451–1526*

सुलतानशाहीतील लोदी घराण्याच्या काळात भारताची अर्थव्यावस्था प्रगत स्वरूपाची होती. सुलतान सिकंदर लोदीने शेतीकडे लक्ष दिले होते. त्याने शेती तंत्रावर भर देवून विकसीत भू–राजस्व नीती बनवली. त्याच्या राज्याच्या आजूबाजूला शेती योग्य जमीन होती. अधिकाधिक उत्पन्न घेतल्याने आर्थिक घडी नीट बसली होती.

शेतीचा विस्तार करून शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सिकंदर लोदीने शासन व्यवस्थेत आवश्यक ते बदल केले. जमीनदार आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या जोखडातून शेतकऱ्यांना मुक्त केले आणि त्यांना जमीन कसण्यासाठी प्रोत्साहित केले. याबाबत रिजकुल्लाह मुश्ताकी म्हणतो–''सुलतानाने एक इंच सुध्दा जमीन पडीक ठेवली नाही'.

सिकंदर लोदीच्या काळात उत्पन्नाच्या 1/3 हिस्सा कर रूपाने घेतला जात असे. खोत, मुकादम आणि पटवारी यांच्या मार्फत कर गोळा केला जात असे. सिकंदर लोदीने जमीनीची प्रतवारी तीन भागात केली होती. बटाई, जप्ती आणि कानकुट. जमीन मोजनीसाठी बत्तीस बोटांचा गज वापरला त्याला ''गज–ए–सिकंदर'' म्हणतात. त्याच्यानंतर लोदी घराण्यातील शेरशहा आणि इस्लामशहाने शेतीमध्ये महत्त्वाचे परिवर्तन घडवून आनले. त्यांनी तालुका आणि जिल्हा पातळीवर नवीन अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या.

शेरशहाने जमीनदारांवर अनेक बंधने घातली. त्यानेच नव्याने जमीन मोजनीपध्दत सुरू केली. अबूल फजल म्हणतो–''जमिनीची क्षमता लक्षात घेऊन शेरशहाने उत्तम, मध्यम आणि हलकी अशा तीन भागात प्रतवारी केले. उत्पन्नाच्या 1/3 हिस्सा कर स्वरूपात घेतला जात असे मात्र वसूली करतेवेळी त्या क्षेत्रात जो बाजार भाव आहे त्यानुसारच नगद कर घेतले. एकंदर शेरशहाच्या शेतकऱ्यांबद्दल असलेले सौम्य धोरणाचे अबूल फजल कौतुक करतो.[8]

या काळात गहू, बाजरी, मका, मटार, तीळ, तांदुळ, ऊस, कापूस, अद्रक, मिरची यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जात असे. शिवाय फळांचे उत्पादनही मोठ्या प्रमाणात घेतले जात होते. आंबे, केळी, अंगूर, खरबूज, लिंबू, जांभळ इत्यादी फळांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जात होते.[9]

*समारोपः–*

सुलतानशाहीच्या काळात शेती क्षेत्राकडे सुलतानाने अधिक लक्ष पुरविल्याचे दिसते. त्यामुळेच शेतीतंत्र विकसित होऊन शेतीचा प्रचंड विकास झाला. सुलतानाने शेतकऱ्यांना अधिक प्रोत्साहन दिल्यामुळे अधिकाधिक जमीन लागवडीखाली आली. कालवे, विहीरी, धरणे बांधून शेतीला पाणीपुरवठा केल्यामुळे उत्पन्नात भर पडली. परिणामी सुलतानशाहीच्या काळातील अर्थव्यवस्था मजबूत झाली.

*संदर्भ–*

1) गुप्ता माणिकलाल, भारतीय इतिहास, एटलांटिक पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नई दिल्ली, 2000
2) आचार्य धनंजय, भारताचा इतिहास श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर. एप्रिल 2006
3) द्विवेदी आर. एस., मध्यकालीन भारत, विश्वभारती पब्लिकेशन्स, नई दिल्ली, 2008
4) परूथी आर. के., सलगत कालीन भारत का आर्थिक इतिहास, अर्जून पब्लिशिंग हाऊस नई दिल्ली, 2005
5) गुप्ता माणिकलाल, मध्यकालीन भारत का इतिहास, अर्जून पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, 1998
6) परूथी आर. के., सनातन कालीन भारत आर्थिक इतिहास, अर्जून पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, 2005
7) आचार्य धनंजय, भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन नागपूर, 2008
8) परूथी आर. के. आणि भण्डारी दीपा, इतिहास विश्वकोष, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, 2008
9) कठारे अनिल, वाघ संदेश आणि मंजुळकर अंबादास, मध्ययुगीन भारत, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर 2011



***गौतम गोविंद सोनवणे***
सह–प्राध्यापक, इतिहास विभाग, एस.बी.कॉलेज, शहापूर, जि. ठाणे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ Directory Of Research Journal Indexing
- ✶ International Scientific Journal Consortium Scientific
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org